
MARATHI

# कटपीस कुमार

इंदु हरिकुमार



एकलव्य

# कटपीस कुमार



कथा व चित्रे
**इंदु हरिकुमार**

अनुवाद
**रमा हर्डीकर-सखदेव**

एकलव्य




कुमारला वेगवेगळ्या वस्तू
बनवायला खूप आवडायचं.





तो काड्यापेट्यांपासून पुस्तकं आणि खेळणी बनवायचा. बाटल्यांच्या झाकणांपासून कॅस्टानेट वाद्य बनवायचा. तो त्याच्या बाहुल्यांसाठी जुन्या कापडांचे कपडेसुद्धा शिवायचा. अम्मा त्याला लाडाने, ‘माझा कटपीस कुमार’ असं म्हणायची.



एक दिवशी कुमार आपल्या खेळण्यांशी खेळत बसला होता, तेव्हा अम्मा आली आणि त्याच्या शेजारी बसली. तिने त्याच्या खांद्यावरून हात टाकत त्याला जवळ घेतलं आणि म्हणाली, “कुमार, मला तुला काहीतरी सांगायचंय. तीन महिन्यांनी आपल्या घरी बाळ येणारे. तुला छोटी बहीण किंवा भाऊ होणारे. कसं वाटतंय तुला?”



कुमारने अम्माला मिठी मारली आणि म्हणाला, “ओह! मला बहीण खूप आवडेल. पण भाऊसुद्धा आवडेल. मला बाळ आलेलं खूपच आवडेल आणि मला बाळासाठी काहीतरी बनवायला हवं.”



“पण मी काय बनवू?” त्याने खूप विचार केला.

बाळाला स्पर्श करता येईल, हातात धरता येईल, आणि त्याला त्यातून आपलं प्रेम जाणवेल असं काहीतरी कुमारला बनवायचं होतं.



कुमारने खूप विचार केला.
शाळेत आणि घरीसुद्धा तो
विचार करत होता.
दिवसरात्र त्याच्या डोक्यात
तेच चालू होतं.





मग एक दिवशी सकाळी पलंगावर लोळत पडलेला असताना, तो अचानक उठून बसला आणि म्हणाला, ‘‘गोधडी! मी एक गोधडी बनवतो. त्यामुळे बाळाला उबदार वाटेल.’’

पण त्यासाठीचं कापड कुठून आणायचं?





अम्मा म्हणाली, "माझ्या
फाटलेल्या ब्लाउजमधून
तुला सूर्य घेता येतील."

अम्मामा म्हणाली,
"माझ्या जुन्या साडीतून
मी तुला लाटा देईन."



बाबाने कुमारला त्याच्या जुन्या सुती शर्टाचा खिसा दिला.

आजीने एक पिवळ्या कापडाची पट्टी दिली.




पण सगळ्यात भारी कापडं त्याला चांद मास्टर शिंप्याच्या दुकानातून मिळाली.

काय वेगवेगळी नक्षी असलेली कापडं होती त्याच्याकडे!




कुमारने सगळे तुकडे वेगवेगळे केले आणि त्यातले आवडलेले निवडून घेतले. त्याने त्या कापडांमधून चांदण्या, सूर्य, होड्या कापल्या. त्याच्याकडे पिवळे, लाल आणि हिरवे कटपीस होते. त्याने ते हव्या त्या रचनेत मांडले आणि सुई-दोरा घेऊन शिवायला सुरुवात केली.






त्याने काही सरळ रेषा काढल्या, काही वेड्यावाकड्या तर काही नागमोडी. काही रेषा लाटांसारख्या वळणदार होत्या. काही गोल आकारही होते.








त्या रेषा डावीकडून
उजवीकडे आणि वरून
खाली जात होत्या.





कुमार रोज शाळेत जायच्या आधी आणि शाळेतून आल्यावर गोधडीवर काम करायचा. अम्मामा म्हणाली, “याला साडीचं अस्तर हवं.” अम्मामाने त्याला अस्तर लावायला मदत केली. तीन महिन्यांच्या शेवटी गोधडी शिवून पूर्ण झाली.

बाळासाठी घरी काय वाट पाहत होतं, बघा तरी!









# कटपीस कुमार
CUTPIECE KUMAR

कहानी व चित्र: इंदु हरिकुमार
अनुवाद : रमा हर्डीकर-सखदेव
सम्पादन : मिलिंद परांजपे
डिझाईन : कनक शशी

मराठी अनुवाद : एकलव्य फाउंडेशन, जून २०२३
चित्रे : इंदु हरिकुमार, जून २०२३

हि पुस्तक Attribution-Non-Commercial-NoDerivatives 4.0 International (CC BY-NC-ND 4.0) लायसन्सच्या अंतर्गत आहे ज्याचे विवरण https:creativecommons.org/licecses/by-nc-nd/4.0/ वर उपल्ब्ध आहे.

वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या पुस्तकाचा उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखक आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कुठल्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखकांशी अवश्य संपर्क करा.


पराग इनिशिएटीव्ह, टाटा ट्रस्ट यांच्या आर्थिक मदतीतून साकार

पहिली आवृत्ती : जून २०२३ (2000 प्रती)
कागद : १०० जीएसएम मॅट आर्ट आणि मुखपृष्ठ ३०० एफएफबी बोर्ड
ISBN : 978-93-94552-93-7
मूल्य : ₹ 130.00

हे पुस्तक इंग्रजीमध्ये *Cutpiece Kumar* आणि हिंदीमध्येही *कटपीस कुमार* या नावाने उपलब्ध आहे.

प्रकाशक : एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
जाटखेडी, भोपाळ 462 026 (मध्य प्रदेश)
Phone: +91 755 297 7770-71-72
Website: www.eklavya.in; Email: books@eklavya.in

मुद्रक : आदर्श प्रा लि, भोपाल; फोन: +91 755 255 5442





इंदु हरिकुमार चित्रकार आणि लेखक आहे. तिला गोळा केलेल्या वस्तूंसोबत काम करायला आवडतं. ती कलेच्या माध्यमातून मुलांना शिकवते, आणि तिने मुलांची अनेक पुस्तकं लिहून त्यात चित्रंही काढली आहेत. तिचं काम भारतात आणि परदेशातही प्रदर्शित झालं आहे. काम करताना तिला बॉलिवूडची गाणी म्हणायला आवडतं.

कुमारच्या
घरी लवकरच नवा पाहुणा
येणार आहे. त्यामुळे तो खूप खूश आहे.
त्याला त्या नव्या पाहुण्यासाठी काहीतरी
बनवायचंय. तो विचार करतो, खूप विचार
करतो आणि काय बनवायचं ते ठरवतो...

एकलव्य
मूल्य: ₹ 130.00
9 789394 552937
parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS